24 NOV 2018 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिरगावच्या नामदेव चरापले यांना गुणवंत अधिकारी पुरस्कार प्रदान

वार्ताहर
शिरगांव

सध्या कोल्हापुरात स्थायिक असलेले मूळचे शिरगावचे सुपूत्र नामदेव चरापले यांना 'गुणवंत अधिकारी वर्ग दोन" पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

शिवाजी विद्यापीठातील भाषा विभागामध्ये लँग्वेज लॅब टेक्निशियन म्हणून बारा वर्षे काम करणाऱ्या नामदेव चरापले यांना विद्यापीठाच्या संगणक केंद्रामध्ये वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक म्हणून त्यांची बढती झाली. तब्बल चोवीस वर्षांच्या सेवेत त्यांनी प्रशासनासह संगणक केंद्रामध्ये उत्कृष्ट



**कोल्हापूर : नामदेव चरापले, अंजली चरापले यांना गुणवंत अधिकारी पुरस्कार प्रदान करताना उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील, डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरु डी. टी. पाटील, डॉ. विलास नांदवडेकर व इतर.**

काम केल्याबद्दल त्यांना गुणवंत अधिकारी वर्ग दोन पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमात नामदेव चरापले व पत्नी अंजली चरापले यांना जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील, प्र. कुलगुरु डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रशस्ती पत्र देऊन सन्मानित कण्यात आले.

यामध्ये त्यांना डॉ जहागीरदार, डॉ. पी. पी. पाटील, डॉ. जयप्रकाश शिंदे, संगणक केंद्राच्या संचालिका स्वाती एस. खराडे यांचे मार्गदर्शन लाभले. बाबुराव चरापले, शोभा चरापले, धनाजीराव चरापले उपस्थित होते.

24 NOV 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# कबड्डीचा थरार सोमवारपासून...

## पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी स्पर्धा : शिवाजी विद्यापीठ येथे २६ ते ३० नोव्हेंबर दरम्यान होणार स्पर्धा

प्रतिनिधी

कोल्हापूर

पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी स्पर्धा शिवाजी विद्यापीठात २६ ते ३० नोव्हेंबर दरम्यान होणार आहेत. या स्पर्धेसाठी पश्चिम विभागातील ७ राज्यातील सर्व विद्यापीठातून ६८ संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेतील विजेत्या ४ संघांची ऑल इंडिया कबड्डी स्पर्धेसाठी निवड होणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळाडू तथा अर्जुन व शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त शांताराम जाधव यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शिवाजी विद्यापीठात २० ते ३० नोव्हेंबर दरम्यान पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेचे उद्घाटन शनिवार दुपारी ४ वाजता विद्यार्थी भवन जवळील ओपन एअर थिएटर येथे होणार आहे. पश्चिम विभागातील ६८ विद्यापीठ संघातील ८१६ खेळाडू व १३६ कोच, व्यवस्थापक वं ५० पंच नेमले आहेत. या स्पर्धा मॅटवर होणार असल्याने लोककला केंद्रात चार मॅटींग मैदाने (कोर्ट) तयार करण्यात आली आहेत. तसेच दोन मॅटींग कोर्ट सरावासाठी उपलब्ध आहेत. या मैदानावर सकाळी आणि सायंकाळी अशा दोन सत्रात कब्बडी स्पर्धा होणार आहेत. प्रकाश झोतात सामने घेतले जाणार आहेत. पहिल्या फेरीतील सामने बाद पध्दतीने होतील व दुसऱ्या फेरीतील साखळी पध्दतीने होतील. या स्पर्धा असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीच्या नियमानुसार होणार आहेत. पहिला सामना सरदार पटेल युनिव्हर्सिटी, वल्लभ विद्यानगर गुजरात व आय. टी. एम. युनिव्हर्सिटी, ग्वॉल्हेर, मध्यप्रदेश यांच्यात होणार आहे. सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे, मुंबई विद्यापीठ, संत गाडगे बाबा अमरावती युतिव्हर्सिटी अमरावती, सोलापूर विद्यापीठ नागपूर विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, यासह ७ राज्यातील ६८ संघ सहभागी होतील. स्पर्धेविषयी सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**पश्चिम विभागातील ७ राज्यातून ६८ संघांचा सहभाग**



यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रिडा संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

### विद्यापीठाची जय्यत तयारी

शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने कब्बडी स्पर्धेची पूर्ण तयारी केली आहे. स्पर्धेच्या नियोजनासाठी १५ समित्यांची नेमणूक करून, प्रत्येक समितीला कामे वाटून दिली आहेत. या समित्यांमध्ये ५० अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे. स्पर्धकांची राहण्याची सोय पाच बंगला, स्पोर्ट हॉस्टेल, विद्यार्थी भवन, कॉटर्समध्ये करण्यात आली आहे. विद्यापीठ प्रशासनाकडून या स्पर्धेची तयारी पूर्ण झाली आहे,

जनसंपर्क कक्ष
24 NOV 2018 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाकडून संशोधनाला चालना

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

युजीसीकडून संशोधनासाठी दिले जाणारे अनुदान काही प्रमाणात बंद झाल्याने शिवाजी विद्यापीठ स्वतंत्र निधीतून संशोधनाला प्रोत्साहन दिले जाते. यामध्ये पदवी तृतीय वर्ष, पदव्युत्तर व्दितीय वर्ष व महाविद्यालयीना व विद्यापीठातील अधिविभागांच्या प्राध्यापकांना संशोधनासाठी अनुदान दिले जात आहे. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत ९४ संशोधन पेपर सादर झाले आहेत, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. शिर्के म्हणाले, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठात संशोधनाचे कार्य यशस्वीपणे सुरू आहे. यामध्ये पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रिसर्च सेन्ससटायझेशन उपक्रमांतर्गत १० हजार रुपये अध्ययनवृत्ती (स्टायपेन) दिली जात आहे. या उपक्रमात जवळपस ६० महाविद्यालयांचा समावेश असून, हा उपक्रम लीड कॉलेज अंतर्गत राबवला जात आहे. तर पदव्युत्तरचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रिसर्च प्रमोशन स्किम सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत पदव्युत्तरचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पाच वर्षे दरमहा ५ हजार रूपये अध्ययनवृत्ती दिली जाते. त्यामुळे विद्यापीठ भविष्यात संशोधन क्षेत्रात अव्वल राहणार आहे, असा विश्वासही डॉ. शिर्के यांनी व्यक्त केला.